# नोटीस

विषय :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व 15 वा वित्त आयोगांतर्गत नाशिक महानगरपालिका स्तरावरील दि 18/03/2025 रोजीच्या जाहिरात क्र 02/2024 प्रमाणे PUBLIC HEALTH MANAGER, STAFF NURSE FEMALE, STAFF NURSE MALE, 15 TH MEDICAL OFFICER पदाकरीता प्राप्त अर्जावरुन तयार यादीच्या अनुषंगाने उमेदवारांकडून हरकती मागविणेबाबत..

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान नाशिक महानगरपालिका स्तरावरील रिक्त पदे वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार या कार्यालयाच्या स्तरावरुन भरतीप्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार दि 18/03/2025 ते 31/03/2025 या कालावधीमध्ये प्राप्त अर्जावरुन स्वीकृत (Accepted) व नाकारलेले (Rejected) उमेदवारांची यादी तयार केलेली असून या सुचनानुसार 05/06/2025 ते 11/06/2025 या दरम्यान कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत उमेदवाराकडुन हरकती मागविण्यात येत आहे......

- <u>सदर हरकतींमध्ये खालीलप्रमाणे हरकती स्विकारल्या जाणार नाहीत</u>

1)नव्याने अर्ज, अपुर्ण/ चुकीचे अर्ज

2)डिमांड ड्राफ्ट चुकीचा असल्या, बॅकेमार्फत नाकारल्या असल्यास किवा जोडलेला नसल्यास नविन डिमांड ड्राफट स्विकारला जाणार नाही.

3) अनुभव प्रमाणपत्र चुकीचा असल्याने किवा जोडलेला नसल्याने नविन अनुभव प्रमाणपत्र स्विकारला जाणार नाही.

- <u>स्विकारल्या जाणाया हरकती खालीलप्रमाणे-(अर्ज फक्त या हरकतीं करीता सक्षम कागदपत्रासह करण्यात यावा.)</u>

१) शैक्षणिक कागदपत्रांची पुर्तता (गुणपत्रक, सीजीपीए स्कोअर वयाचा वैयक्तिक पुरावा, जातीचा वैयक्तिक दाखला, महाराष्ट्र नर्सिंग कोन्सिल/ पदाशी संबधित कौन्सिल/ वैध नोंदणी प्रमाणपत्र/नुतनीकरण नोंदणी प्रमाणपत्र )

२) अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र, तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) कागदपत्र यांची छायांकीत प्रत

३) महाराष्ट्र राज्याचा अधिवासी प्रमाणपत्राची (Domicile Certificate) छायांकित प्रत

४) अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रूपांतर करून ते प्रमाणित करून घ्यावे व त्याची प्रत अर्जासोबत जोडावी त्यानुसार अर्जात गुणांची टक्केवारी नमूद करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ प्रत सादर करावी.

५) ज्या वैद्यकीय/निमवैद्यकीय पदांकरिता संबंधित वैद्यकीय/निमवैद्यकीय परिषदेची नोंदणी अनिवार्य आहे. अशा अर्जदारांनी संबंधित परिषदेकडे नोंदणी केलेले अदयावत प्रमाणपत्र

6) नावात दुरुस्ती, गुणांनमध्ये दुरुस्ती (पुराव्यासह)

7) NHM अंतर्गत कार्यरत असल्यास संबधित कार्यालयाचा सदयस्थितीत कार्यरत असलेबाबत प्रमाणपत्र व ना हरकत दाखला सादर करावा.

सदर हरकती यापूर्वी देण्यात आलेल्या <u>जाहीरातीनुसार नाशिक महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभाग,एन यु एच एम कक्ष,या ठिकाणी</u> लेखी स्वरुपात प्रत्यक्ष सादर कराव्यात. विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत हरकती स्विकारल्या जातील याची नोंद घ्यावी .

.

Sd/-

वैदयकिय आरोग्य अधिकारी

नाशिक महानगरपालिका नाशिक

नाशिक महानगरपालिका नाशिक

राष्ट्रिय शहरी आरोग्य अभियान व 15 वा वित्त आयोग

**हरकती सादर करण्यासाठीचा नमुना**

जाहिरात क्र ......./२४

अर्ज करण्यात
आलेल्या पदाचे नाव :- ------------------

अर्जदाराचे नाव :- ......................................

पत्ता:- .................................................
.................................................

अर्ज क्रमांक :- ............

मो.क्रं. :- ...............................................

दिनांक :- ........................................

प्रति,

मा. वैदयकिय आरोग्य अधिकारी सो
नाशिक महानगरपालिका नाशिक

विषय:- प्रारुप यादीच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे जमा करणेबाबत...

मा. महोदय,

मी सही करणार विनंती पुर्वक अर्ज करते / करतो की, माझे शिक्षण .................... झालेले असुन, मी .................................... या पदासाठी अर्ज केलेला होता. तरी प्रारुप यादीच्या अनुषंगाने माझे खालील प्रमाणे कागदपत्रे प्रलंबित/ त्रुटी दाखविण्यात आलेले आहे तरी मी खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

१) .............................................

२) ............................................

३) ............................................

४) ............................................

५) .............................................

६) ............................................

तरी वरीलप्रमाणे मी एकुण ............. प्रती सोबत जोडत आहे. तरी त्या स्विकारण्यात याव्यात व माझा अर्ज ग्राहय धरण्यात यावा ही नम्र विनंती.

अर्जदाराची स्वाक्षरी,

(अर्जदाराचे नाव :- )